लोकमत

# धुळे - मुंबई गाडीला रेल्वेमंत्र्यांची मंजुरी : डॉ. सुभाष भामरे यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** धुळे ते मुंबई अशी स्वतंत्र रेल्वेची अनेक वर्षापासूनची धुळेकरांची मागणी होती. थेट धुळे रेल्वेस्टेशन ते मुंबई दादर स्टेशनपर्यंत रेल्वे सुरु करण्यास रेल्वेमंत्र्यांनी मंजूरी दिली आहे. सध्या स्थितीत सुरू असलेली मनमाड-दादर अमृतसर एक्सप्रेस आता धुळे रेल्वे स्थानकावरून सुटणार असून धुळे-मनमाड-दादर असा तिचा प्रवास असणार आहे. आठवड्यातून तीन दिवस प्रायोगिक तत्त्वावर चाचणी घेतल्यानंतर ही रेल्वे रोज धुळेकरांचा सेवेत असेल, अशी माहिती खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी दिली.

लॉकडाऊन काळात बंद झालेली मुंबई बोगी धुळ्याकडे येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली होती. यामुळे प्रवाशांनी धुळे-मुंबई बोगीसाठी खासदार डॉ. भामरे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. तर भामरे यांनी स्वतंत्र रेल्वेचीच मागणी लावून धरल्याने आणि तसा प्रस्तावही रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडून तयार करून घेतला. धुळे - मनमाड - दादर अशी रेल्वे सुरू होण्यास रेल्वे बोर्डाचा हिरवा कंदील मिळाला आहे. ही रेल्वे प्रायोगिक तत्वावर आठवड्यातून तीन दिवस आणि प्रतिसाद मिळू लागताच रोज ही रेल्वे प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहे.

सकाळी साडेसहा वाजेला धुळे स्थानकावरून निघणारी ही गाडी दुपारी साधारणपणे दीड वाजेला मुंबईला पोहोचेल आणि तिकडून दुपारी साडेचार वाजेला निघेल व रात्री अकरा वाजेला धुळे स्थानकावर पोहोचेल, असे तिचे नियोजन राहणार आहे.

खासदारांनी रेल्वे मंत्रालय आणि रेल्वे बोर्डाचे अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क ठेवून स्वतंत्र रेल्वे सुरू करावी अशी मागणी लावून धरली होती. यासाठी अनेकदा दिल्ली, मुंबई आणि भुसावळ या ठिकाणी चर्चा आणि बैठकाही झाल्या. अखेर या नव्या रेल्वेसाठीचे प्रस्ताव तयार करण्यात आले. या प्रस्तावाला आता हिरवा कंदील मिळाला असून धुळे-मनमाड-दादर म्हणजेच मुंबई ही रेल्वे धुळेकरांच्या सेवेत लवकरच दाखल होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. प्रतिसाद मिळू लागताच रोज धुळे - मुंबई आणि मुंबई - धुळे असा प्रवास करण्यासाठी धुळेकरांना या रेल्वेचा लाभ घेता येणार आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विन कुमार वैष्णव आणि रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे यांच्यासह रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी आभार व्यक्त केले आहे. मुंबईसाठी रेल्वे सुरु होणार असल्याने धुळेकर प्रवाश्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे.



मंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडून मंजुरीचे पत्र स्वीकारताना खासदार डॉ. भामरे

Hello Dhule
Page No. 1 Apr 07, 2023
Powered by: erelego.com